विकास नियंत्रण नियमावली — ठाणे महानगरपालिका .
**ठाणे महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये परिशिष्ट- डब्ल्यूमध्ये फेरबदल करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदल.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
शासन निर्णय क्र. टिपीएस-१२१४/१३२५/ प्र.क्र.९०/१४/नवि-१२
४ था मजला , मंत्रालय,मुंबई : ४०० ०३२,
दिनांक : - २३ जून, २०१५.

**शासन निर्णय:-** सोबतची शासकीय अधिसूचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(संजय वि.पवार)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) आयुक्त,ठाणे महानगरपालिका,ठाणे.
३) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) सहसंचालक तथा सह सचिव,(नगर रचना), यांचे स्वियं सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.
५) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
६) सहायक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे.
७) व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.

(त्यांना विनंती की, सोबतची शासकीय अधिसूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्राच्या भाग-१ कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे, संचालक नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई व सहाय्यक संचालक, नगर रचना, ठाणे शाखा, ठाणे यांना पाठवाव्यात.)

८) कक्ष अधिकारी, कार्यासन नवि-२९, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
२/- त्यांना विनंती की, सदरहू अधिसुचना विभागाच्या वेब साईटवर प्रसिध्द करावी.
९) निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- २३ जून, २०१५.**

**अधिसुचना**
**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**
क्रमांक-टिपीएस-१२१४/१३२५/प्र.क्र. ९०/१४/नवि-१२.

ज्याअर्थी, ठाणे शहर महानगरपालिकेसाठीची विकास नियंत्रण नियमावली (यापुढे जीचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यांत आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम"असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२९४/१२५९/प्र.क्र.२२२/९४/नवि-१२, दिनांक २८ एप्रिल, १९९५ (यापुढे जिचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे) अन्वये मंजूर झाली असून, ती दिनांक १ जून,१९९५ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त नियमावलीचे परिशिष्ट-डब्ल्यू हे हस्तांतरणीय विकास हक्काबाबत आहे ;

आणि ज्याअर्थी, मंजुर आराखडयातील आरक्षणे / रस्ते ताब्यात घेण्याकरीता प्रचलित विकास हक्क हस्तांतरण प्रक्रिया व नियमातील बदल करुन त्यामध्ये अधिक पारदर्शक व लवचिकता आणि कार्यक्षमता आणणेकरिता उक्त नियमावलीच्या परिशिष्ट-डब्ल्यू मध्ये फेरबदल करण्यासाठी ठाणे महानगरपालिकेने (यापुढे जीचा उल्लेख" उक्त महानगरपालिका "असा करण्यात आला आहे ) उक्त अधिनियमातील कलम ३७ (१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन सदर तरतुदीमध्ये बदल करण्याचा प्रस्ताव दिनांक २८ जुलै, २०१४ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरीकरीना सादर केला आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख "प्रस्तावित फेरबदल" असा करण्यात आला आहे);

आणि ज्या अर्थी, राज्यातील नागरी क्षेत्रासाठीच्या मंजूर विकास योजनेच्या विकास नियंत्रण नियमावलीतील हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) व समावेशक आरक्षण यांच्या तरतुदी आकर्षक व स्विकाराह होण्याच्या दृष्टीने त्यांत फेरबदल करण्याचा सर्वकष विचार करुन संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अभ्यास गटाच्या मदतीने त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर अहवालास शासनाने मान्यता दिली असून त्यामध्ये आवश्यक तेथे दुरुस्ती करुन त्यानुरुप प्रारुप नियमावली प्रसिध्द करणेचे प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे. त्या अनुषंगाने सदरच्या हस्तांतरणीय विकास हक्क व समावेशक आरक्षणाबाबतच्या प्रारुप

नियमावलीबाबत ...च्या सुचना / हरकती मागविण्यासाठी उक्त अधिनियमाचे कल. ३७(१अअे) अन्वये दि. ३०/४/२०१५ रोजीची सुचना शासनाने प्रसिध्द केली आहे व सदरची प्रारुप नियमावली महाराष्ट्रातील इतर महानगरपालिका क्षेत्रासोबत ठाणे महानगरपालिका क्षेत्राकरितासुध्दा लागू करण्याचे प्रस्तावित आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता व आवश्यक ती चौकशी केल्यानंतर आणि संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे.

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करुन शासन प्रस्तावित फेरबदल नामंजूर करत आहे ;

०२. सदर अधिसूचना नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) आयुक्त,ठाणे महानगरपालिका,ठाणे.
२) सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन,नवी मुंबई.
३) सहाय्यक संचालक नगर रचना, ठाणे शाखा, जि.ठाणे.

०३. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**(संजय वि.पवार)**
**कार्यासन अधिकारी**

GOVERNMENT OF MAHARASHTRA
URBAN DEVELOPENT DEPARTMENT
Mantralaya, Mumbai-400032.
Dated :- 23rd June, 2015

**NOTIFICATION**

No. TPS-1214/1325/CR-90/14/UD-12,

Maharashtra Regional and Town planning Act, 1966

Whereas, the Development Control Regulations for Thane City Municipal Corporation(hereinafter referred to as "the said Regulations") have been sanctioned by the Government in the Urban Development Department , under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966, ( hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS/1294/1259/CR-222/94/UD-12, dated the 28th April, 1995; (hereinafter referred to as " the said Notification ") and have come into force with effect from 1st June 1995;

And whereas, manner of generation and utilisation of Transferable Development Rights (hereinafter referred to as 'T.D.R.") situated within the area of Development Plan of Thane, is regulated as per the Appendix-W of the said Regulations ( hereinafter referred to as "the said provision")

And whereas, while acquiring reservations and roads of sanctioned Development Plan to provide efficient and transparent policy in Transferrable Development Rights process, the Thane Municipal Corporation (hereinafter referred to as " The said Corporation"), after following the legal procedure under sub-section 1 of section 37 of the said Act, has submitted a proposal vide letter dated 28th June, 2014 for effecting a modification to the said provision (hereinafter referred to as "the proposed Modification"):-

And whereas, the policy of Transferrable Development Rights and accommodation reservation for the entire state is being revised so as to make it more attractive, and accordingly study group under Director of Town Planning, Maharashtra State, Pune has submitted its report to the Government, and the said report is sanctioned by the

Government, and accordingly, with some changes wl  ver necessary notice under section 37(1AA) dated 30/4/2015 has already been issued by the Government to call suggestions/objections from the general public;

And whereas the said notice is applicable to the Thane Municipal Corporation along with other Municipal Corporations,

And whereas, after considering the above facts and making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that the proposed modification should be rejected ;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (2) of section 37 of the said Act, the State Government refuses to accord sanction to the proposed modification:-

02. This notification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

i) The Commissioner , Thane Municipal Corporation, Thane.
ii) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.
iii) The Assistant Director of Town Planning ,Thane Branch, Thane

03. This notification shall also be published on Government Website at www.maharashtra .gov.in.

**By order and in the name of the Governor of Maharashtra.**

**(Sanjay .V. Pawar)**
**Section Officer**